# सचिन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

## मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०००८१

**(Regd. No. BOM/HSG/1629 of 1968)**

न.क्र. ____________________

## -: परिपत्रक :-

सर्व सन्माननीय सभासदांना माहित आहे की, संस्थेच्या इमारत क्र. १ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र गेली अनेक वर्षे कार्यरत होती. सन २०१७-२०२२ या कालावधीत कार्यरत असलेल्या व्यवस्थापन समितीच्या अयोग्य कार्यवाहीमुळे सदर बँक संस्थेच्या इमारत क्र. १ मधून बाहेर पडली. त्या दिवसापासून बँकेकडून भाड्याच्या रुपाने (दरमहा रु. ४,५०,०००/-) संस्थेला जे उत्पन्न प्राप्त होत होते. ते बंद झाले. परिणामी संस्थेचे भरुन न येण्यासारखे आर्थिक नुकसान झाले. हे आजपर्यंत चालूच आहे.

सदर बँक संस्थेच्या जागेतून बाहेर पडली असती तरी ज्या जागेत (इमारत क्र. १) ती कार्यरत होती त्या जागेचा ताबा अधिकृतपणे बँकेकडून संस्थेला मिळालेला नाही तो मिळविण्यासाठी बँकेची संस्थेकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम (रु. २४,५७,६००/-) बँकेला परत करणे आवश्यक आहे. संस्थेचा बँकेकडून भाड्याच्या रुपाने येणारा उत्पन्नाचा स्त्रोत गेली काही वर्षे खंडीत झाल्यामुळे संस्थेची तिजोरी जवळ – जवळ रिकामी झाली आहे.

वरील परिस्थितीचा विचार करुन रविवार दि. २३ जून २०२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेने बँक ऑफ महाराष्ट्र यांची संस्थेकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यासाठी संस्थेच्या सर्व २२० सभासदाकडून प्रत्येकी रु. १२,०००/- (रुपये बारा हजार मात्र) दि. ३१.०७.२०२४ पर्यंत संस्थेकडे जमा करावेत असा ठराव एकमताने पारित केला आहे.

आता सर्व सन्माननीय सभासदांस या परिपत्रकाद्वारे विनंती / आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी प्रत्येकी रु. १२,०००/- (अक्षरी रुपये बारा हजार मात्र) संस्थेच्या खाली नमूद केलेल्या खात्यात ३१.०७.२०२४ पर्यंत स्वतंत्रपणे जमा करावेत.

मासिक बिलाच्या धनादेशामध्ये वरील रक्कम अंतर्भूत केल्यास ती स्वीकारली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

संस्थेच्या हितार्थ आपण सर्व सन्माननीय सभासद याबाबतीत सहकार्य कराल याची खात्री आहे.

दि. २५.०६.२०२४

Milind

**मिलिंद राऊळ**
**मा. सचिव**

**संस्थेच्या खात्याचा तपशील :-**

बँक ऑफ महाराष्ट्र, मुलुंड (पूर्व),
A/c No. २०११२२७४३९७
IFSC Code – MAHB0000761

**टीप :-** ३१.०७.२०२४ पर्यंत रु. १२,०००/- संस्थेकडे जमा न करणाऱ्या सभासदास त्यावर नियमाप्रमाणे व्याज (Interest) लावण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.